**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१**

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) - २०२२**

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'पवित्र' या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **'शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२२'** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक | https://ibpsonline.ibps.in/mscepjan23/ |
| २ | ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक ३१/०१/२०२३ ते दिनांक ०८/०२/२०२३ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दि. ०८/०२/२०२३ रोजी २३:५९ वाजे पर्यंत. |
| ४ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्राप्त करून घेण्याचा कालावधी | दिनांक १५/०२/२०२३ पासून |
| ५ | ऑनलाईन परीक्षा दिनांक | दिनांक २२/०२/२०२३ ते दिनांक ०३/०३/२०२३ (प्रविष्ट उमेदवारांच्या संख्येनुसार व उपलब्ध भौतिक सुविधेनुसार यामध्ये बदल होऊ शकतो) |

- परीक्षेचे माध्यम, अभ्यासक्रम, पात्रता, अर्ज करण्याची कार्यपध्दती व कालावधी याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- अर्ज भरताना परिक्षार्थीनी इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी, पदविका, पदवी इ. शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता तसेच दिव्यांगत्व, राखीव प्रवर्गाचे असल्यास त्याबाबतची माहिती मूळ प्रमाणपत्रावरूनच भरावी. स्कॅन केलेला अद्ययावत रंगीत फोटो, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठयाची निशाणी व स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्र ऑनलाईन आवेदनपत्रात अपलोड करणे आवश्यक आहे.
- सदर परीक्षेस व पुढील कार्यवाहीसाठी उमेदवारांशी SMS, Email व्दारे संपर्क होऊ शकतो. त्यामुळे उमेदवारांनी स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक व Email ID अचूक द्यावा.
- ऑनलाईन आवेदनपत्रासोबत कोणत्याही प्रमाणपत्रांच्या प्रती जोडण्याची आवश्यकता नाही. मूळ प्रमाणपत्राच्या पडताळणीस अधीन राहून उमेदवारांना परिक्षेस तात्पुरता प्रवेश दिला जाईल व निकाल घोषीत केला जाईल. ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये भरलेल्या माहितीत व मूळ प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळून आल्यास कोणत्याही स्तरावर उमेदवारी रद्द केली जाईल.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक: ३१/०१/२०२३**

**(संजयकुमार राठोड)**
उपायुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे -०१,

Scanned with CamScanner